# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/2117/2023-24 दि.05 / 12 /2023

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक या पदावर कार्यरत कर्मचारी यांच्या टंकलेखन परिक्षेबाबत.

**परिपत्रक**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1112/प्र.क्र.88/नवि-28, दि. 05 डिसेंबर, 2022 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार लिपीक-टंकलेखक या पदासाठी शैक्षणिक अर्हता व पात्रता विहित करण्यात आली आहे.

लिपीक-टंकलेखक या पदासाठी शैक्षणिक अर्हता व पात्रतेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक कर्मचारी यांना संगणकावर मराठी व इंग्रजी टंकलेखन करणे आवश्यक आहे. परंतू लिपीक-टंकलेखक कर्मचारी संगणकावर मराठी व इंग्रजी टंकलेखन करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक कर्मचारी यांना संगणकावर मराठी व इंग्रजी टंकलेखन करता येत आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करणेकरीता शनिवार दि.03/02/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे टंकलेखन परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक यांनी दि.03/02/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता उपस्थित राहावे. जे लिपीक-टंकलेखक कर्मचारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका

/- विभागप्रमुख/खातेपगमुख यांनी सदरचे परिपत्रक अधिनस्त कार्यरत लिपीक-टंकलेखक कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे

D:\पदोन्नती 2021\परिपत्रक\टंकलेखन परिक्षा.doc